# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - २२६९२१०२.

E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Website : www.dtemaharashtra.gov.in


जा. क्र.१०/एनजीपी/प्रवेश प्रक्रीया/२०१७-१८/३८८०

दिनांक : 13 OCT 2017

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

अमरावती/औरंगाबाद/मुंबई/नागपुर/नाशिक/पुणे

**विषय- शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील प्रवेश विहीत कालावधीत कर्न्फम/अपलोडींग केले नसल्याने सदर प्रवेश कर्न्फम/अपलोडींग करण्यास मान्यता देणेबाबत...**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, मा. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई येथे दि. ११.१०.२०१७ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील १) प्रथम वर्ष पोस्ट एस एस. सी. पदविका २) प्रथम वर्ष पोस्ट एच. एस. सी. पदविका व ३) थेट व्दितीय वर्ष पोस्ट एस. एस. सी. पदविका अभ्यासक्रमातील प्रवेश विहीत कालावधीत कर्न्फम/अपलोडींग केले नसल्यामुळे सदर प्रवेशाबाबत निर्णय घेण्यात आला. सदर बैठकीचे इतिवृत्त मिळण्यास काही कालावधी लागणार असुन मंडळाच्या ॲकेडमीक कॅलेंडरनुसार प्रथम वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाची प्रात्यक्षिक परिक्षा दि. ३०.१०.२०१७ पासुन व थेट व्दितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाची प्रात्यक्षिक परिक्षा दि. २३.१०.२०१७ पासुन सुरु होणार असल्यामुळे बैठकीचे इतिवृत्ताच्या **अधिन राहुन** खालील नमुद केल्याप्रमाणे तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

१. सदर बैठकीमध्ये ज्या विद्यार्थ्यांचे प्रवेश **फक्त केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत** ( कट ऑफ डेटनंतर प्रवेश रद्द केलेले कॅपमधील विद्यार्थी वगळुन ) झालेले आहेत, अशाच विद्यार्थ्यांचे प्रवेश शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये प्रति विद्यार्थी जो दंड आकारण्यात आलेला आहे त्याच्या दुप्पट दंड शैक्षणिक वर्ष २०१७-१८ च्या वर नमुद प्रकरणांसाठी आकारुन प्रवेश कर्न्फम/अपलोडींग करण्यास बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. सदर दंडाची रक्कम तात्काळ धनाकर्षाव्दारे Commissioner, State Common Entrance Test Cell, M.S., Mumbai यांचे नांवे काढुन सदर धनाकर्ष संबंधित तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयामार्फत मा. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांचेकडे जमा करण्यात यावेत.

२. सदर दंडाची रक्कम विद्यार्थ्यांकडुन वसुल न करता सदर रक्कम संस्थेने स्वत: भरणे आवश्यक असुन तशा आशयाचे हमीपत्र संस्थांनी विभागीय कार्यालयामार्फत या संचालनालयास सादर करणे आवश्यक आहे.

३. सदर दंडाची रक्कम संबंधित विनाअनुदानित संस्थासोबत शासकीय, अशासकीय अनुदानित संस्थांनीसुध्दा भरणे आवश्यक आहे.

४. ज्या संस्थांनी संस्थास्तरावरील प्रवेश विहित कालावधीत कर्न्फम/अपलोडींग केलेले नाहीत अशा प्रवेशास दि. ११.१०.२०१७ रोजीच्या बैठकीत मान्यता दिली नसल्याने संबंधित संस्थांनी सदर प्रवेश रद्द करणेबाबत संबंधित विद्यार्थ्यांना तात्काळ कळविणे आवश्यक आहे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विभागीय कार्यालयामार्फत या संचालनालयास सादर करण्यात यावा.

थेट व्दितीय वर्ष पोस्ट एस. एस. सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील प्रवेश कर्न्फम/अपलोडींग करण्याची कार्यवाही संबंधित तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयामार्फत दि. १७.१०.२०१७ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत करण्यात यावी. त्याकरिता आवश्यक ती लिंक विभागीय कार्यालयाना या संचालनालयामार्फत उपलब्ध करुन देण्यात येईल.

तसेच प्रथम वर्ष पोस्ट एस एस. सी. व प्रथम वर्ष पोस्ट एच. एस. सी. पदविका अभ्यासक्रमातील प्रवेश कर्न्फम/अपलोडींग करण्याची कार्यवाही संबंधित संस्थेने सोबत जोडण्यात आलेल्या विवरणपत्रात विभागीय कार्यालयात सादर करावी व विभागीय कार्यालयानी सदर माहिती एकत्रित संकलित करुन दि. १७.१०.२०१७ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सॉफ्ट व हार्ड कॉपी desk10@dtemaharashtra.gov.in या ईमेलवर पाठविण्यात यावे.

(ए. ई. रायते) भा.प्र.से.
संचालक,
तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

**प्रतिलिपी:-** मा. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, बांद्रा (पुर्व), मुंबई यांना माहितीस्तव सादर.
**प्रत:- माहिती व उचित कार्यवाहीसाठी रवाना.**
२. कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र. ३, मुख्य कार्यालय, मुंबई.
३. संचालक, महाराष्ट्र राज् तंत्रशिक्षण परिक्षा मंडळ, बांद्रा, मुंबई यांना कळविण्यात येते की, वर नमुद प्रकरणातील विद्यार्थ्यांचे नोंदणी व परिक्षा अर्ज भरण्याची कार्यवाही विहित कालावधीत करण्यात यावी.
४. प्राचार्य, सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित पदविका संस्था.

## Annexure A

List Post SSC CAP Allotted Candidate but not confirmed/Reported by Institute

Name of Region:-

| Sr. No. | Application ID | Name of Candidate | Allotted Choice Code in CAP | CAP Round |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| | | | | |
| | | | | |

Signature
Principal of Institute

Signature
Joint Director
Regional Office,

## Annexure B

List Post HSC CAP Allotted Candidate but not confirmed/Reported by Institute

Name of Region:-

| Sr. No. | Application ID | Name of Candidate | Allotted Choice Code in CAP | CAP Round |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| | | | | |
| | | | | |

Signature
Principal of Institute

Signature
Joint Director
Regional Office,